**.भाग - 1**

## <u>प्रस्तावना</u>

लोकसभा आणि राष्ट्रपतींनी संमत केलेल्या माहितीचा अधिकार कायदा 2005 प्रमाणे प्रख्यापित केलेल्या अध्यादेशानुसार सदर पुस्तिका तयार करण्यात आली आहे. ती सर्वसाधारण जनतेला शक्यतो सर्व आवश्यक माहिती देण्याकरिता आहे. डॉ. रु.न.कूपर म.स.रुग्णालयामध्ये पुरविल्या जाणा&या सेवांचा लाभ घेणा-या सर्वसाधारण जनतेने ही पुस्तिका वापरावी असा हेतू आहे. डॉ. रु.न.कूपर रुग्णालयाची सुरुवात, त्याची रचना , व्यवस्थापन , कामकाज यासह सर्वसाधारण रुग्णालयाचा भाग असलेल्या सर्व बाबींब्द्दलची माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे.

एखादया व्यक्तीस या पुस्तिकेत दिलेल्या भागांबद्दल अधिक माहिती हवी असेल तसेच इतर काही माहिती हवी असेल तर त्यांनी वैद्यकीय अधिक्षक किंवा उप वैद्यकीय अधिक्षक किंवा वरिष्ठ वैद्यकीय अधिक्षक किंवा प्रशासकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. या पुस्तिकेत न दिलेली माहिती मिळविण्याकरिता , माहिती अधिका&यांकडे विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. ती माहिती पुरविण्याकरिता येणारा खर्च ( छायाप्रती, टपाल आणि तत्सम आवश्यक खर्च) शुल्क म्हणून आकारण्यात येईल.